**Newspaper: Loksatta**

**Date: 8/7/2025**

**News highlighting the achievements of Podarites- Shardul Vichare who has an AIR-3 in the CA Foundation and Isha and Ishada Damle twin sisters who cleared CA Final**

# डोंबिवलीतील शार्दुल विचारे सी. ए. फाऊंडेशन परीक्षेत देशात तिसरा

लोकसत्ता खास प्रतिनिधी

**डोंबिवली :** ठाकुर्ली ९० फुटी रस्ता परिसरातील गृहसंकुलात राहणाऱ्या शार्दुल विचारे या विद्यार्थ्याने पहिल्या टप्प्यातील सनदी लेखापाल (सी. ए. फाऊंडेशन) परीक्षेत ४०० पैकी ३५८ गुण मिळून देशात तिसरा क्रमांक मिळविण्याचा मान मिळविला.

शार्दुल डोंबिवली एमआयडीसीतील ओंकार इंटरनॅशनल शाळेचा 'आयसीआयसीआय' परीक्षा मंडळाचा विद्यार्थी आहे.

बारावी परीक्षेनंतर शार्दुलने सी. ए. फाउंडेशनची परीक्षा दिली होती. 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउन्टट इन इंडिया' संस्थेतर्फे ही परीक्षा घेण्यात आली. शार्दुलला दहावीत ९५ टक्के, बारावीत ९९.०६ टक्के गुण मिळाले होते.

**लो**

**शार्दुलला दहावीत ९५ टक्के, बारावीत ९९.०६ टक्के गुण मिळाले होते. या परीक्षेतील गणित विषयात शार्दुलला १०० पैकी १०० गुण मिळाले.**



शार्दुल विचारे

या परीक्षेतील गणित विषयात शार्दुलला १०० पैकी १०० गुण मिळाले. सनदी लेखापाल परीक्षचे अद्याप दोन टप्पे आहेत. ते आपणास पूर्ण करायचे आहेत. त्यादृष्टीने आपण तयारी केली आहे. सनदी लेखापाल होण्याची आपली तीव्र इच्छा आहे. ती पूर्ण करण्याचे नक्की केले आहे, असे शार्दुल म्हणाला.

सनदी लेखापाल झाल्यानंतर विदेशाचा विचार न करता देशात आपली पुढची व्यावसायिक वाटचाल सुरू ठेवू. आपणास वाचनाची आवड आहे. क्रिकेट पाहणे, खेळण्याची आवड आहे. अभ्यास करतानाच हे छंद आपण जोपासतो. आई, वडील वित्तीय सल्लागार आहेत, असे शार्दुलने सांगितले.

## जुळ्या बहिणींचे यश



कल्याणमधील 'लोकग्राम'मध्ये कुटुंबीयांसमवेत राहणाऱ्या ईशदा भालचंद्र दामले आणि ईशा भालचंद्र दामले या जुळ्या बहिणींनी सनदी लेखापाल परीक्षेच्या अंतिम पूर्व परीक्षेत यश मिळवले आहे. सनदी लेखापाल होण्याचे ध्येय दोघी बहिणींनी निश्चित केले होते. त्या दिशेने त्यांनी आपली शैक्षणिक वाटचाल केली. कल्याणमधील 'लोकग्राम'मध्ये दोघींनी दहावीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. माटुंगा येथील पोद्दार महाविद्यालयात कनिष्ठ, उच्च महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केले. ईशा हिला बारावीत ९८.०७ टक्के गुण पडले होते. ती राज्यात पहिली आली होती. तर ईशदा हिला ९४ टक्के गुण मिळाले होते. पदवीचा अभ्यास करताना दोघी बहिणींनी सनदी लेखापाल परीक्षेच्या अभ्यासाला सुरुवात केली. ईशा दुसऱ्या ग्रुपमधून यशस्वी झाली, तर ईशदाने दोन्ही ग्रुप एकावेळी देऊन यश संपादन केले. या दोघींचे वडील बँकर होते. ते गेल्या वर्षी सेवानिवृत्त झाले.